दिनांक 28/10/2023 (शनिवार) दुपार

---

**नैसर्गीक आपत्तीमुळे शासनाकडून नुकसान भरपाई देण्याचे आमीष देवून शेतकऱ्यांच्या ११३,४६,९९,००३/—रूपयाचा अपहार करून फसवणुक करणारे मुख्य दोन आरोपी गजाआड**

**स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई**

पोलीस स्टेशन मौदा जिल्हा नागपुर ग्रामीण नागपुर येथे नागपुर जिल्हयातील पिडीत १५८ शेतकरी यांना नैसर्गीक आपत्तीमुळे शासनाकडून नुकसान भरपाई देण्याचे आमीष देवून त्यांचेकडुन विश्वासाने संबंधीत कागदपत्र घेवुन शेतकरी यांचे नावे करोडो रूपयाचे बोगस कर्ज प्रकरणे तयार करून ते बँक रेकॉर्डवर खरे असल्याचे दाखवून ११३, ४६, ९९,००३ /—रूपयाचा अपहार करून फसवणुक केल्याचे फिर्यादीचे रीपोर्ट वरून पोलीस स्टेशन मौदा येथे गुन्हे रजि नं. ७८३/२०२३ कलम ४०६, ४०९, ४१३, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब) भादंवि सहकलम ३ एम. पी. आय. डी. सहकलम ६६(बी) आय.टी. ॲक्ट नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) यांनी सदर गुन्हयातील मुख्य आरोपी **रमन्नाराव मुसल्या बोल्ला व विरव्यंकटराव सत्यनारायण वाकलपुडी** यांचा शोध घेवुन अटक करण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण येथील विशेष पथक तयार केले. वरिष्ठांनी दिलेल्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक दोन्ही आरोपींचा शोध सुरु करून तांत्रिक पद्धत तसेच गोपनिय बातमीदार यांच्याकडुन खात्रीशिर माहिती मिळाली की, आरोपी हे कर्नाटक राज्यातील बँगलोर व आंध्रप्रदेश राज्यातील विजयवाडा येथे असल्याची माहिती मिळाली. सदर माहितीवरून वरीष्ठांच्या परवानगीने सुरूवातीला बॅगलोर येथे शोध घेवुन तेथे मिळुन न आल्याने त्यानंतर विजयवाडा आंध्रप्रदेश येथे जावुन शोध घेतला असता दोन्ही आरोपी विजयवाडा येथे एका हॉटेल मध्ये मिळुन आले. स्थानिक पोलीसांच्या मदतीने दोन्ही आरोपी नामे— **१) रमन्नाराव मुसल्या बोल्ला वय ४८ वर्ष रा. प्लॉट नं. ५९४/२५० भारत नगर, कळमना, नागपूर आणि २) विरव्यंकटराव सत्यनारायण वाकलपुडी वय ४३ वर्ष रा. डुंबरी स्टेशन, चंपा आश्रम, पोस्ट खंडाळा तह. पारशिवनी जि. नागपूर** यांना कायदेशिररित्या ताब्यात घेतले.

वरील दोन्ही आरोपीतांना पुढील कायदेशीर प्रक्रियेकरीता आर्थिक गुन्हे शाखे अंतर्गत विशेष तपास पथकाकडे दोन्ही आरोपीतांना ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) तसेच अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले साहेब यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस उपनिरीक्षक बट्टूलाल पांडे, पोलीस हवालदार विनोद काळे, इक्बाल शेख, दिनेश आधापुरे, पोलीस नायक रोहन डाखोरे, सतीश राठोड यांनी पार पाडली.

सदर गुन्हयाचा तपास विशेष पथकाचे प्रमुख उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग श्री. आशित कांबळे (भा.पो.से.), उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग श्रीमती पूजा गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण येथील पोलीस निरीक्षक किशोर नगराळे, सहायक फौजदार शांताराम मुदमाळी, पोलीस हवालदार प्रविण सिडाम, अजिज शेख, सचिन खरबडे, ललीत उईके, महिला पोलीस हवालदार स्वाती लोखंडे, विशाखा मुंडे, पोलीस नायक गजेंद्र निंबेकर, पोलीस अंमलदार वृशभ उईके, निलेश बरडे हे करीत आहे. सदर दोन्ही आरोपीतांना आज रोजी मा. न्यायालयात हजर करून १४ दिवसाचा पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आला.

## कोळसा चोरी

पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा घाटरोहना येथे दिनांक २६/१०/२०२३ चे १८.३० वा. ते १८.४५ वा. सुमारास फिर्यादी नामे— अनिल मूरलीधर डोकरीमारे, वय ३२ वर्ष (डब्ल्यु सी एल कॉलनी सिक्युरीटी गार्ड) यांची एरीया पेट्रोलींग दरम्यान गस्त घालतांनी घाटरोहना डॅम्पींगच्या मागुन काही बाईकनी ईसम कोळसा चोरून नेतांनी मिळाले त्यांना पकडले असता आरोपी नामे— **(१) विजय बारमाटे, (२) निलेश तांडेकर वय ३० वर्ष रा. घाटरोहना (३) स्वप्नील रंगारी वय ३० वर्ष, रा. घाटरोहणा (४) सुमित रंगारी वय ३२ वर्ष रा. घाटरोहना (५) आकाश मारबते, वय २३ वर्ष, रा. घाटरोहना (६) नितीन मारबते रा. घाटरोहना (७) विनोद मारबते रा. घाटरोहना** हे आपली मोटार सायकल मोक्यावर सोडुन पळून गेले आरोपीतांच्या ताब्यातून ७ मोटार सायकली आणि १५ बोरी कोळसा अंदाजे वजन १०५० किलो कोळसाची किंमती अंदाजे ६३००/— रू. मोटरसायकल १) एम. एच —४०/ई — १४७४ हिरो होंडा (२) एम. एच — ४०/एच — १६८३ होंडा शाईन कंपनीची (३) एम. एच — ४०/व्ही — ७८६१ हिरो होंडा स्प्लेंडर (४) एम. एच — ४०/ए. जे — ३४८९ हिरो होंडा सिडी डिल्कस (५) एम. एच — ४०/बी —८०९२ हिरो होंडा स्प्लेंडर (६) एम. एच — ४०/डी — ९७७८ हिरो होंडा स्प्लेंडर (७) एम. एच — ४०/ यु — ६७४३ हिरो होंडा अशा एकुण ०७ दुचाकी वाहन व सोबत १५ बोरी बारी कोळसा अंदाजे वजन १०५० किलो कोळसाची किंमत ६३००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार जळते मो. नं. ९६७३८३७००७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर